RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Refereed Research Journal**

Editor
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com,
Shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

# 'मनाची वारूळं' या ललित लेखसंग्रहातील निसर्गाचा आपुलकीपणा

**प्रा. डॉ. दादासहेब गिऱ्हे**

(मराठी विभाग)

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना

'स्वरूप प्रकाशन' या संस्थेने खरोखर एक दर्जेदार पुस्तक साहित्य क्षेत्राला दिलेले आहे. पुस्तकाच्या गाभ्यात लेखकाच्या मनातील गाभ्याचा संसार जाणवतो. लेखकांच्या मनातील तळमळ सांगते की, ग्रामीण भागातील -तळागाळातील जनतेच्या सुख दुःखाचा विचार साहित्याच्या गाभ्यातून समाजासमोर यावा व त्यांच्यावर विचार होऊन काहीतरी नवीन परिवर्तनाची दिशा मिळावी हाच त्यांच्या 'मनातील वारू' हा ललित लेख त्यांच्या मनातील विचार व्यक्त करतो. निसर्गामध्ये माणूस रममाण होतो. आपले सुख दुःख तो निसर्गाच्या सान्निध्यात विसरून जातो. निसर्ग त्याला चिंतन करायला लावतो. म्हणून 'निसर्ग मानवाचा सोबती' बनतो तो मानवाची मनं फुलवितो, माणसाला उल्हासीत बनवितो. तसेच निराशावाद धुडकावून आशावाद निर्माण करतो.

लेखकाच्या निसर्गाचं दुसरं रूप भावलं. ते म्हणजे 'पाऊस ' या ललित कथेतून असंख्य पाऊस धारा आभाळातून वरदान बनून कोसळत असतात. ग्रामीण आपुलकीचं नातं पावसानं जोडलेलं आहे. श्रावण महिना म्हणजे अखंड संतत धार घेऊन आलेला व माणसाच्या मनातील नवलाईचा उत्साह ओतप्रोत बनून वाहतो. गावातील नुकत्याच लग्न झालेल्या पोरी सासरी गेलेल्या असायच्या व आपल्याला माहेराहून कधी मुऱ्हाळी येतो त्याची आतुरतेने वाट पाहात बसायच्या. माहेरी आल्यानंतर आईशी गप्पा मारून आपलं मन मोकळं करणं, झोके खेळणं, फुगड्या खेळणं व गाणं म्हणणं चालत असतं, नव्या नवऱ्या सारखं लाजून मुरडून, नटून-थटून साऱ्या गल्ल्या-बोळयातून गप्पा मारीत फिरणं श्रावण महिन्याच्या काळात घडत असतं. जुन्या काळया पाऊस म्हणजे खऱ्या अर्थानं आठवणींच्या काळात पडत असतं. जुन्या काळया पाऊस म्हणजे खऱ्या अर्थाने आठवणींचाच पाऊस. आज गाण्यातुन पावसाला आठवावे लागते. आज खेड्यातील माणसंच पार बदलून गेली आहेत. लहरी बनली आहेत. त्यामुळेच की, काय पाऊसही लहरी झाला. गावांच्या शिवारात शहरी वारी वाहू लागले आहेत. माणसे साधी राहीलेली नाहीत. तर खट्याळ व कट कारस्थानी बनलीत. राजकारण हे गरीबीच्या उतरंडी पर्यंत पोहचले. गावाला गावपणं राहिलेलं नाही. खेड्यातील तरूण मंडळी आता शिकली सवरलेली आहेत. शब्द व पोषाखाच्या आहारी गेलीत अनं आपली संस्कृती विसरत चालली. उठ सुBठ शहराकडे धावणारा शेतकरी बाह्यांगी सगळा बदललाय अन पावसानंही बदलायचं ठरवलंय. 'रंग गाव तमाशाचे' लेखकांच्या संवेदनशिलतेचा आलेख ठरू शकतो. त्याच्या बालमनाला बसलेले धक्के त्यानं मन मोकळे पणानं सांगितले. यामध्ये लेखकाची संयम लिता, दिसून येते. यामुळे लेखकांच्या अंगी खूप मोठं मन आहे याची वारंवार जाणीव होते. काकांचं धोंडू-कोंडू तमाशात जाणं, पडेल ते काम करणं, त्याचं ढोलकी शिकणं, परत गावांत येणं, एकदा त्याचे काका दिवाळीच्या सणाला घरी आले व परत तमाशात गेलेच नाही. तेव्हापासून गावंच्या तमाशात ते ढोलकी वाजवत असत. या काळातील लेखकांच्या जीवनातील एक आठवण एकदा काकाने त्यांना बळजबरीने सोबत नेले. पिंपळाच्या झाडाजवळ चार पत्रे टाकलेली खोली. तिथे कोण राहाते याचे फार मोठे कुतुहल ! त्याघरातुन एका म्हाताऱ्या स्रीचं बाहेर येणं व त्यांना आंत घेऊन जाणं, घरात पट्ट्या पट्ट्यांच्या संतरंजीवर नटून-थटून बसलेली रूबाबदार

स्री. नंतर तीनं काका व लेखकांसाठी ओसरीवर एक बाज बसण्यासाठी टाकणे. म्हतारीच्या बोलण्यावरून ती तिची मुलगी असावी असे वाटणे नक्षीबाज टाकलेल्या घोंगडीवर त्यांचं बसणं. त्याचं अदबीनं पाणी पिणं, ताक पिणं, यावेळी लेखकांच्या मनाची झालेली घालमेल व अस्वस्थपणा शब्द कुंचल्यातुन तंतोतंत उमटतो व डोळ्यांसमोर बारकावे उभा करतो.

स्वतः लेखकाने बालपणाचे वर्णन करतांना कुठलाही आडपडदा ठेवलेला नाही. त्याचे मळकट कपडे, व त्या सुंदर स्रीची चौकटीची नक्षीदार नाटी व कंचोळी यामधुन त्याने दोन राहणी मानातील विरोधाभास दाखविला. कोल्हाटीन स्रियांच्या पोषाखाचा बरबरीत पाही लेखकाच्या नजरेतून शब्दात उतरलेला आहे हे दिसून येते. लेखकाच्या मनामध्ये निर्माण झालेला प्रश्न की 'ही माझी माय कशी ?' त्याचा कांही क्षण उडालेला गोंधळ संवादी शैलीनं सुंदर टिपलेला आहे. ललित लेखनातील हा एक नविन प्रयोग लेखकाने समर्थपणे झेलला. याचं खरे कौतुकच वाटतं. कौशीच्या सौंदर्याची व निर्मळ जीवनाची एक निती लेखकानं मनात बनवून ठेवली होती. पण खिडकीतून एका पहीलवानाबरोबर लाजण्या-मुरडण्या सोबतच झोंबालोंबी करतांना पाहील्यावर क्षणात तिच्या बद्दलच्या सर्व भावना बदलल्या. हे प्रांजळपणाचं लक्षण लेखकानं यां ललित कृतीत दाखविलं आहे.

'ऊसतळं' या ललित लेखात लेखकाने पठारी भागातील व डोंगराळ मराठवाड्यातील शेतीजीवनाची उध्वस्त गाथा आपणाला सांगितली. पाऊस खुपच लागुन राहिल्यामुळ सडून व किडून गेलेल्या पिकांवर गुजराण होणं शक्य नाही म्हणून ते शेत-मजुर कारखान्याच्या परिसरात ऊसतोड कामगार म्हणून धाव घेतात. पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र कष्ट करतात. बायका-मुलं बरोबर नेऊन सर्वस्व अपर्णण करून पैसा मिळवतात. गरीबांना तोंड बंद ठेवणं हाच उपाय असतो. कापुस, तुरी जोंधळा, मटकी भरगच्च पिकानं भरलेलं रान पंधरा दिवसाच्या पावसांच्या राड्यानं एकदाचं चिभडलं व बायको पोराबाळांचं आता कसं भागायचं ? हा प्रश्न आ वासून पुढं उभा राहातो. गाडी-बैल भाड्यानं करून रातोरात चारापाण्याच्या गाठोड्यासहीत सख्या बाळु व चंद्रीला व सुंदर बायकोला घेऊन कारखान्यावर आला. फाटक्या-तुटक्या लुगड्यात असलेली समिंदरा बागायतदारांच्या पोरांच्या नजरेत आली. अशा एका पाण्याच्या चारीवर ती धुणं धुत होती. तिथंसुद्धा ही टारगट पोरं आली व काही बोलायला लागली. असतळावर काम करतांना, झोपडीत स्वयपाक करतांना, पाण्याचा हंडा आणतांना ते सगळं तिला न्याहाळत होती. प्रलोभन दाखवून उडवायचा प्रयत्न, समिंदरानही नवरा-पोरासोरांना उघडं टाकून निघून गेली. बागायती क्षेत्रामध्ये गरीबाच्या मुळावर आलंला जीवघेणा अनुभव लेखकाने अतिशय बाणेदार शब्दात टिपलेला आहे. कारखानदारी मुळं खेड्यात वैभव जरी निर्माण झालेलं असलं तरी हळुहळु तडा जात आहे. परंतु गरीब व दारिद्र्य लोकांचं आयुष्य उद्वस्त होत आहे. चमचमते वैभव समाजाच्या प्रतिष्ठेला घाव घालत आहे. आणि जीवनाच्या सर्व अर्थ बदलत आहेत. कदाचित लेखकाला आपल्या लेखनीतून हेच सांगावयाचे असावे.

❖❖❖❖